महाराष्ट्र 6 जुलै 2025

निर्दोष व्यक्तीवर आरोप झाल्यास त्यांचे

ठेवून विघातक प्रवृ

# 'सायबर शिक्षा'च्या क्लब ऑफिसर्ससाठी निवड

## जे. एम. पटेल महाविद्यालयाचे विद्यार्थी

भंडारा, ब्युरो. येथील जे. एम. पटेल महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागातील 4 विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या राष्ट्रीय अभियानासाठी क्लब ऑफिसर्स म्हणून निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये वृषांक लांडगे (प्रेसिडेंट), जय धनरे (सेक्रेटरी), उत्कर्ष गणवीर (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर), विजय लांजेवार (पी.आर. मीडिया डायरेक्टर) यांचा समावेश आहे.

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण व ओरिएंटेशन पुणे येथील विमान नगर येथील क्विक हिल कंपनीच्या मुख्य कार्यालयात पार पडले. यावेळी अजय शिर्के व गायत्री पवार यांनी सायबर गुन्हेगारी, प्रतिबंधात्मक उपाय व सायबर सुरक्षेची मुलभूत माहिती दिली. क्विक हिल फाउंडेशनच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचा संदेश समाजात पोहोचविण्याचे आवाहन केले.

महाविद्यालय आणि फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत हे विद्यार्थी पुढील काही आठवडे शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर सिक्युरिटी अवेअरनेस उपक्रम राबवतील. समाजात सायबर सुरक्षेची जाणीव निर्माण करण्याची संधी मिळणार आहे. यासोबतच, "कमवा आणि शिका" उपक्रमांतर्गत त्यांना आर्थिक मदतीची तरतूद करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदीप मेश्राम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत त्यांच्या सशक्त कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या. उपक्रमासाठी संगणक विभागप्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर, तसेच प्राध्यापक डॉ. सबाह नसीम, प्रा. पलाश फेंदेवार, प्रा. प्रियंका शर्मा आणि प्रा. फरीना शेख यांनी मार्गदर्शन व मेहनत घेतली.

# विजय प... सेवानिवृ...

तिरोडा. तालुक्याती... सरांडीचे मुख्याध्या... पटले हे नियतकालि... जून रोजी सेवानिवृत्त... सेवेनंतर सेवानिवृत्ती... श्रीफळ पुष्पगुच्छ व भे... करण्यात आला. ... हायस्कूल सरांडी ... रामसागर धावडे, संस्थे... पाटील, संस्थेचे अध... इतर पदाधिकारी तसेच... जया धावडे सर्व ... कर्मचारी सत्कार समा... सत्कार समारंभात ... बोलताना मुख्याध्या... म्हणाले की मी ... विद्यार्थ्यांच्या सर्वांगी... गुणवत्ता वाढीसाठी ... विद्यार्थ्यांशी असलेल... सर्व सहकारी कर्म... आपुलकी माझ्या ... असेल, प्रगती हा... स्मरणात राहील. ... मी सेवानिवृत्तीनंतर ...

# युवा पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

भंडारा. जिल्ह्यातील तरुणांनी समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव व्हावा, तसेच तरुणांना प्रेरणा मिळावी, यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येतो. 2024-25 या वर्षासाठीच्या पुरस्कारासाठी 25 जुलैपर्यंत अर्ज मागविले आहेत. एक तरुण, एक तरुणी व एक नोंदणीकृत संस्था यांना जिल्हास्तरावर हा पुरस्कार दिला जाईल. वैयक्तिक पुरस्कारासाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व 10 हजार रुपये रोख रक्कम दिली जाईल. संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व 50 हजार रु. रोख रक्कम प्रदान केली जाईल. जिल्हा क्रीडा अधिकारी, भंडारा यांच्या कार्यालयात 25 जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत.

## निधन

**प्रा. कमलाकर खटी**

भंडारा. नरकेसरी वॉर्ड

प्रेरणादायी • तहसीलदारांचा पु...


# छप्पर उडाले; ...

समाजभान

साकोली, (ता. प्र.). साकोलीत पटाच्या दाणी व गोपाळ वस्तीतील कुटुंबांना गेल्या काही दिवसांच्या मुसळधार पावसाने अक्षरशः उघड्यावर आणले. मातीची घरे कोसळली, छप्पर उडाली आणि हाताशी काहीच उरले नाही, अशा संकटात, कोरड्या सरकारी प्रक्रियांपेक्षा एका संवेदनशील अधिकाऱ्याच्या माणुसकीने त्यांना दिलासा दिला.

तहसीलदार नीलेश कदम यांनी प्रशासकीय चौकटीच्या पलीकडे जाऊन स्वखर्चातून ताडपत्री वाटून पावसाने उघड्यावर आणलेल्या कुटुंबांना पुन्हा एका छपराखाली आणले.

गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे साकोली तालुक्यातील पटाच्या दाणीवरील बेलदार



बोकडे, भारत बिहा... सोरते, कमल ... शिवणकर, मोतीराम ... शिवणकर यांसारख्... संकटात सापडले ... घरातील सामान भि... लहान मुलांच्या आरो... निर्माण झाला होता. ...